



# कोल्हापूर महानगरपालिका

## मा. मुख्यमंत्री १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत

# क्षेत्रीय कार्यालयातील सुधारणा कार्यक्रम


# 1. संकेतस्थळ

https://web.kolhapurcorporation.gov.in

## अ) वापरण्याची सुलभता (User Friendliness)

- युनिकोड, द्विभाषी, **शासकीय डोमेन** असलेले संकेतस्थळ.
- कर्मचारी व नागरिकांसाठी **सिंगल विंडो लॉगीन**.
- नागरिकांना **FAQs, अभिप्राय, SMS**, इ. सुविधा.

दि. 18/04/25 अखेर संकेतस्थळावर नागरिकांच्या भेटी: 6,88,110




## आ) माहितीचे अद्ययावतीकरण (Updated Information)

- महानगरपालिका ठराव झालेले दिवशीच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येते.
- बांधकाम विभागांतर्गत विविध विकासकामे, कंत्राटदार, कार्यादेश, मंजूर रक्कम व कालावधी, DLP Period, इ. माहिती उपलब्ध.
- विविध निविदा/कोटेशन नोटीस, नोकर भरती जाहिरात, इ. संकेतस्थळावर उपलब्ध.
- सर्व विभागप्रमुख तसेच अधिकारी यांचे संपर्क क्रमांक, ई-मेल, माहिती इ. संकेतस्थळावर उपलब्ध.

# 1. संकेतस्थळ

https://web.kolhapurcorporation.gov.in




## इ) माहिती अधिकार स्वयंप्रकटीकरण (Proactive Disclosures)

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील तरतुदीनुसार जास्तीत जास्त व अद्ययावत माहितीचे प्रसिद्धीकरण.



Code Decode Labs
Decoding Complex

**CERTIFICATE OF SECURITY AUDIT**
**'SAFE TO HOST'**

CDL-CSS/VAPT-WATA/COA-STH/25-02-323
21/02/2025 to 20/02/2026

**Client Name:** Kolhapur Municipal Corporation, Government of Maharashtra.

**Web Application Name:** Official Website of Kolhapur Municipal Corporation

**Test URL:** https://test.kolhapurcorporation.gov.in/Website/

**Production URL:** https://web.kolhapurcorporation.gov.in/

**Audit Conducted by:** Deeksha Jain (Security Engineer)

**Audit Duration:** 17/02/2025 to 20/02/2025

**Secure Md5 Hash Code:** 8257ef6212c0b040bb0dc38960acce0c

**Assessment Summary:** Recommended fixes have been patched & implemented successfully and revalidated by the assessor. This audit is conducted by our **Indian Computer Emergency Response (CERT-In)** Empanelled Team. We hereby do certify that Web Application is secured now and **'SAFE TO HOST'** on any hosting platform until the next periodic threats assessment.

**Recommendations:**

1. Write permission should be granted only on the given website in the folder where the files have to be uploaded.
2. VAPT shall be conducted whenever major changes are made in source code & site structure.

For, CODE DECODE LABS PVT. LTD.
Authorised Signatory

**Authorized Signatory**
**(Sachin Singhai)**
**Certified Cyber Security Researcher, CEH, CCSP, SCADA & ICS, ISO 31000:2009 & ISO 27001:2013, CPISI, Security Threat Analyst.**

**Assessor Name:** Neha Bagmar
**Assessment Body:** Code Decode Labs Private Limited
**Cert-In Empanelment No.:** 3(15)/2004-CERT-In (Vol. XIII)
**Certificate Number:** CDL-CSS/VAPT-WATA/COA-STH/25-02-323
**Validity Period**: 21/02/2025 to 20/02/2026


**CODE DECODE LABS PVT. LTD.**
H.O. - A-302-402, 'Runwal Sanket', Beside Zudio Store,
Ganaraj Chowk, Baner, Pune - 411045 (MAH, India.
Contact No. - +91-9039038004 I +91-7887801188
info@codedecodelabs.com I www.codedecodelabs.com.

## ई) सुरक्षितता (Cyber Security)

- Cert-In Empanelled एजन्सीद्वारे सुरक्षा लेखापरीक्षण (Security Audit).
- संवेदनशील माहितीच्या सुरक्षिततेसाठी SSL Certificate चा वापर.
- अनधिकृत हस्तक्षेप टाळण्यासाठी Firewall and End Point Security software चे इंस्टॉलेशन.

## उ) लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत अधिसूचित सेवा

- एकुण 52 सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून संकेतस्थळावर प्रसिद्ध.
- अधिसूचित केलेल्या सेवा नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध.
- **आपले सरकार** पोर्टलसोबत सलंग्नीकरण.



# 2. केंद्र शासनाशी सुसंवाद

## अ) राज्याच्या विकासाशी संबंधित केंद्र शासनाकडे प्रलंबित प्रस्ताव व विधेयकांचा पाठपुरावा करून पूर्तता करणे

- PM-Svanidhi, स्वच्छ भारत मिशन, PMeBus, PMAY व अमृत योजना प्रस्ताव मंजूर.



PMAY बोंद्रेनगर झोपडपट्टी पुनर्वसन



AMRUT - 4 MLD STP



AMRUT ESR




पीएम ई-बस प्रकल्प

## आ) राज्यासाठी केंद्रीय योजनांचा दिलेला लक्षांक पूर्ण करणे

- **पीएम-स्वनिधी** अंतर्गत एकूण 20,823 लाभार्थ्यांना रक्कम रु. 33.13 कोटी इतके कर्ज वितरीत.
- **स्वच्छ भारत मिशन** अंतर्गत 2500 टॉयलेट्सचे उद्दिष्ट होते. एकूण 5195 टॉयलेट्स पूर्ण. एकूण 207.8% उद्दिष्ट साध्य.
- **पीएम ई-बस** अंतर्गत 100 इ-बसेस, डेपो डेव्हलपमेंट व चार्जिंग स्टेशन यांचे काम प्रगतीपथावर.
- **प्रधानमंत्री आवास योजना** अंतर्गत 976 घरकुल मंजूर. त्यापैकी 739 घरकुल पूर्ण. 190 घरकुल बांधकाम प्रगतीपथावर.
- **अमृत 1 अभियान**
  1. पाणीपुरवठा योजना - भौतिक प्रगती : 87%; 11 – ESR चे काम पूर्ण; 2 – संप व पंप हाउस पूर्ण; 330 कि.मी. पाईपलाईनचे काम पूर्ण.
  2. मलनिस्सारण योजना – भौतिक प्रगती : 87%; 4 MLD STP पूर्ण व 6 MLD STP चे 98% काम पूर्ण; 68 कि.मी. पाईपलाईन काम पूर्ण.
- **अमृत 2 अभियान**
  - जयंती नाला पंपिंग स्टेशन – 9 MLD, दुधाळी – 19.50 MLD, बापट कॅम्प – 13 MLD, इ. STP चे काम प्रगतीपथावर.

# 2. केंद्र शासनाशी सुसंवाद

**<u>इ) केंद्रीय योजनांसाठी केंद्राचा हिस्सा प्राप्त करून घेणे, राज्याच्या निधी अर्थसंकल्पीत करून वितरीत करून घेणे</u>**

- **पीएम ई-बस** : सदर प्रकल्पासाठी आवश्यक HT Line व LT Line उभारणीसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यादेश देण्यात आले. यासाठी एकूण रु. 17.95 कोटी मंजूर.
- **प्रधानमंत्री आवास योजना** अंतर्गत एकूण रक्कम रु. 19.45 कोटी (80%) रक्कम वितरीत.
- **अमृत 2 अभियान**
  - पाणीपुरवठा योजना - एकूण मंजूर रक्कम रु. 114.81 कोटीपैकी रु. 78.20 कोटी इतकी रक्कम खर्च;
  - मलनिस्सारण योजना – एकूण मंजूर रक्कम रु. 70.77 कोटीपैकी रु. 50.77 कोटी रक्कम खर्च;
- **स्वच्छ भारत मिशन** अंतर्गत IHHL फंड 100% खर्च.



AMRUT ESR




पीएम ई-बस प्रकल्प



AMRUT SUMP



PMAY Project

**<u>ई) केंद्र शासनाच्या विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या पत्रांवर वेळीच कार्यवाही करून अनुपालन सादर करणे</u>**

- **प्रधानमंत्री आवास योजना 2.0** अंतर्गत 498 नागरिकांची नोंदणी.
- नागरिकांची नोंदणी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न.

# 3. स्वच्छता

## अ. अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण





- कार्यालयीन कामकाजात सुसूत्रता आणणेसाठी सहा गठ्ठे पद्धती.
- विविध विभागांमध्ये अभिलेख ठेवण्यासाठी एकूण 18 कॉम्पॅक्टर घेतले.
- अभिलेख वर्गीकरणाची प्रक्रिया विविध विभागांमध्ये सतत सुरु असते.
- मार्च 2025 मधील अभिलेख वर्गीकरण सध्यस्थिती

| अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग |
|---|---|---|
| 65,730 | 40,630 | 75,878 |









## ब. मुदतबाह्य लेखे नष्ट करणे

- मुदतबाह्य लेखे स्कॅनिंग करून घेण्यात येतात. स्कॅन केलेले नस्तींची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| नगररचना | इस्टेट | पाणीपुरवठा | संगणक | रेकॉर्ड | नगरसचिव |
|---|---|---|---|---|---|
| 9,629 | 2,373 | 59,047 | 215 | 293 | 913 |

- स्कॅन झालेले मुदतबाह्य लेखे विहित प्रक्रियेनुसार नष्ट करण्यात येते.




## क. जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण

- वेळोवेळी होणारी खरेदीचे संबंधित विभागांकडून जड वस्तू नोंदवहीत नोंदणी करण्यात येते.
- एप्रिल 2025 रोजीपासून खरेदी करण्यात येणाऱ्या वस्तूंसाठी संगणकीय प्रणाली तयार करण्यात आली असून सदर संगणकीय प्रणालीत विभागनिहाय खरेदी केलेल्या वस्तू, वॉरंटी, साहित्य देण्यात आलेले विभागाचे नाव, इ. माहिती उपलब्ध होईल.

# 3. स्वच्छता

## ई. जड वस्तूंची विल्हेवाट

- जानेवारी 2025 मध्ये संगणक विभागाकडील जुन्या व निरुपयोगी साहित्यांचे निर्लेखन.

| साहित्य | संख्या |
|---|---|
| सीपीयू व मॉनिटर | 61 |
| प्रिंटर | 15 |

| साहित्य | संख्या |
|---|---|
| मोबाईल | 80 |
| ब्ल्यूटूथ प्रिंटर | 60 |

| साहित्य | संख्या |
|---|---|
| बायोमेट्रिक यंत्रे | 17 |
| UPS बॅटरी | 40 |





## उ. जुन्या वाहनांचे निर्लेखन

- Registered Vehicle Scrapping Facility मधील मार्गदर्शक तत्वानुसार, के.एम.टी. च्या 56 बस वाहनांचे निर्लेखन.
- याद्वारे रक्कम रु. 1 कोटी 56 लक्ष महानगरपालिकेस प्राप्त.
- मार्च 2025 पासून कार्यशाळेकडून एकूण 97 वाहनांची निर्लेखनाची प्रक्रिया सुरु.



| | |
|---|---|
| कार-जीप | 25 |
| अम्ब्युलंस | 04 |
| बूम | 03 |
| शववाहिका | 05 |
| फायर फायटर | 08 |
| मिटव्हॅन | 01 |

| | |
|---|---|
| डंपर | 09 |
| टँकर | 19 |
| कचरा ट्रक | 09 |
| जेसीबी | 03 |
| ट्रक्टर | 06 |
| ट्रॉली | 01 |











# 4. तक्रार निवारण

## अ. आपले सरकार

- दि. 01 एप्रिल 2025 पूर्वीच्या प्रलंबित तक्रारींची संख्या : 0
- दि. 17 एप्रिल 2025 रोजी एकूण प्रलंबित तक्रारींची संख्या : 0

| एकूण तक्रारी | निराकरण | प्रलंबित | प्रलंबित (%) |
|---|---|---|---|
| 261 | 261 | 0 | 0% |

## आ. पी.जी पोर्टल

- दि. 01 एप्रिल 2025 पूर्वीच्या प्रलंबित तक्रारींची संख्या : 0
- दि. 17 एप्रिल 2025 रोजी एकूण प्रलंबित तक्रारींची संख्या : 0

| एकूण तक्रारी | निराकरण | प्रलंबित | प्रलंबित (%) |
|---|---|---|---|
| 67 | 67 | 0 | 0% |

## इ. अभ्यागत भेटीचे वेळेबाबत प्रसिद्धी

- आयुक्त कार्यालयात दर बुधवार व गुरुवार रोजी दुपारी 03.30 ते 05.30 पर्यंत अभ्यागतांना भेटीची वेळ.
- दि. 07 जानेवारी 2025 ते आजपर्यंत एकूण अभ्यागत भेटी संख्या : 630
- सदरची वेळ संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे.




## ई. लोकशाही दिनाचे आयोजन

- दरमहा पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन.
- दि. 07 जानेवारी 2025 ते आजपर्यंत लोकशाही दिनात प्राप्त तक्रारी संख्या : 18
- तक्रारीचे निराकरण झालेनंतर, जनसंपर्क विभागाकडून संबंधित नागरिकाला फोनवर कॉल करून खात्री केली जाते.



# 4. तक्रार निवारण

## तक्रार नोंदणी व निवारण

- संकेतस्थळ
- myKMC मोबाईल ॲप
- टोल-फ्री क्रमांक
- सामाजिक माध्यमे (फेसबुक/ट्विटर/व्हाट्सअप)
- आयुक्त कार्यालय – बुधवार, गुरुवार
  विभागीय कार्यालय – सोमवार व मंगळवार
  प्रत्यक्ष अभ्यागत भेट
- **लोकशाही दिन – आयुक्त कार्यालय**
- पीजी-पोर्टल
- आपले सरकार

शहरातील नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविणे व त्याबाबत तक्रारींचे निवारण त्वरेने होणेसाठी प्रभाग क्षेत्र कार्यालयात प्रभाग क्षेत्र अधिकारी यांना सोमवार व मंगळवार सकाळ सत्रात उपस्थित राहणे बंधनकारक.



## महापालिकेत प्रशासकांकडे चार तासांत १४० पेक्षा अधिक तक्रारी

### प्रशासकांकडून गंभीर दखल : निष्क्रिय कारभार चव्हाट्यावर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : महापालिकेत बुधवारी प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांच्याकडे तक्रारी करण्यासाठी रांग लागली होती. चार तासांत तब्बल १४० हून अधिक तक्रारी करण्यात आली. त्याची गंभीर दखल प्रशासक मंजुलक्ष्मी यांनी तातडीने तक्रारींचे निरसन करावे, अशा सूचना केल्या. दरम्यान, या निमित्त महापालिका प्रशासनाचा निष्क्रिय कारभार चव्हाट्यावर आला आहे. अधिकारी, कर्मचारी वेळेत काम करीत नसल्याने प्रशासकांकडे तक्रारी वाढत असल्याचेही पुढे आले आहे.

प्रत्येक बुधवारी, गुरुवारी प्रशासक दुपारी ३ ते ६ या वेळेत अभ्यागतांना भेटत असतात. हे दोन दिवस सामान्यांसाठी हक्काचे असल्याने अनेकवेळा महापालिका यंत्रणेकडे चकरा मारूनही काम न झालेले प्रशासकांना प्रत्यक्ष भेटून तक्रारी, गाऱ्हाणी मांडतात. बुधवारी दुपारी तीन वाजता नेहमी प्रमाणे प्रशासक मंजुलक्ष्मी यांनी अभ्यागत भेटीला सुरुवात केले.

शहरातील सर्वच भागातील अभ्यागतांनी तक्रारीसाठी गर्दी केली होती. मोठी रांगही लागली होती. तीन ते सहा ही वेळ भेटण्याची असतानाही प्रशासक मंजुलक्ष्मी यांनी सायंकाळी सात वाजेपर्यंत कार्यालयात बसून प्रत्येकाची तक्रारी ऐकून घेतल्या. चार तासांत तब्बल १४० हून तक्रारी त्यांनी समजून घेतल्या. तक्रार संबंधित अधिकाऱ्यांकडे देऊन त्या तातडीने सोडवण्याचे आदेश दिले.

अभ्यागत भेटीवेळी उपआयुक्त पंडित पाटील, सहायक आयुक्त कृष्णा पाटील, संजय सरनाईक, सहायक संचालक नगररचना विनय झगडे, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, जल अभियंता हर्षजीत घाटगे, उपशहर रचनाकार एन. एस. पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक डॉ. विजय पाटील उपस्थित होते.

### सर्वाधिक तक्रारी

बुधवारी अभ्यागतांनी केलेल्या तक्रारीत सर्वाधिक तक्रारी नगररचना, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, विद्युत, पाणी पुरवठा विभागाच्या तक्रारी होत्या. या विभागातील खाते प्रमुखांनी आपल्या प्रशासकीय कामकाजाचे परीक्षण करण्याचाही संदेश अप्रत्यक्षपणे यातून मिळाला आहे.

### सभागृह नसल्याने

१ सभागृह नसल्याने नगरसेवक नाहीत. यामुळे छोट्या, मोठ्या प्रत्येक तक्रारीसाठी कार्यालयीन वेळेतच अभ्यागतांना प्रशासनाकडे जावे लागते.

२ अनेक प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सामान्य लोकांच्या कामापेक्षा मलईदार कामांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

३ म्हणून यांच्याकडे वारंवार हेलपाटे मारूनही काम न झाल्याने प्रशासकांना भेटण्यासाठी रांग लागत आहे.



वि. का. 1



वि. का. 3

# 5. कार्यालयीन सोयी-सुविधा

**अ) कायमस्वरूपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था**

कर्मचारी तसेच कार्यालयांमध्ये येणाऱ्या अभ्यागतांसाठी कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध.

**आ) कर्मचारी तसेच अभ्यागतांसाठी स्वच्छतागृह व्यवस्था**

- एप्रिल 2025 मध्ये पुरुष कर्मचारी तसेच अभ्यागतांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाचे नूतनीकरण.
- नियमित स्वच्छता, पुरेसे प्रकाश, पाणी, इ. ची व्यवस्था.

**इ) महिला कर्मचारी व अभ्यागतांसाठी स्वच्छतागृह व्यवस्था**

- मार्च 2025 मध्ये महिला कर्मचारी-अभ्यागतांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाचे नूतनीकरण.
- स्वच्छतागृहात पुरेसे प्रकाश, पाणी, इ. ची व्यवस्था तसेच नियमित स्वच्छता करण्यात येते.
- महिलांसाठी हिरकणी कक्षाची व्यवस्था.














# 5. कार्यालयीन सोयी-सुविधा

**<u>इ. अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतीक्षालये व बैठक व्यवस्था.</u>**

- बसण्यासाठी व्यवस्था.
- पंखा, पिण्याचे पाण्याची सोय.
- विभागीय कार्यालयांमध्ये लिफ्टची सुविधा.





**<u>उ. कार्यालयाचे सौंदर्यीकरण</u>**

- कोमनपा मुख्य हेरीटेज इमारत बांधकाम : सन 1929
- उपक्रम कालावधीत मुख्य इमारत तसेच इतर कार्यालयात स्वच्छता, रंगरंगोटी व दुरुस्ती करण्यात येऊन महानगरपालिकेचे नाव व मानचिन्ह नागरिकांना दिसेल अशा प्रकारे बसविणेत आले.
- इमारतीच्या सभोवती हेरीटेज सदृश्य लाईट बसविण्यात आले.



पूर्वी




नंतर



महानगरपालिकेचे मानचिन्ह




# 6. कामकाजातील सुधारणा

## अ) प्रशासकीय कामकाजात ई-ऑफिस प्रणालीचा वापर

• मनपातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना शासकीय ईमेल आयडी उपलब्ध करण्यात येऊन ई-ऑफिस युजर कार्यान्वित करण्यात आले आहे.

• ई-ऑफिस प्रणालीवर विविध विभागांच्या एकूण फाईलची संख्या : 17,876

• नवीन कर्मचाऱ्यासाठी शासकीय ई-मेल आयडी प्राप्त करून घेणेची कार्यवाही सुरु.




## आ) ई-ऑफिस प्रणालीचा वापर करून कमी स्तरावर निपटारा

विविध प्रस्ताव ई-ऑफिस प्रणालीद्वारे कमी स्तरावरच निर्गत केले जातात.


जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी नागरिकांची दमछाक

प्रशासनाकडूनच चुकीची नोंद; दुरुस्ती प्रक्रियेसाठी वेळ, पैसेही खर्च; संतप्त प्रतिक्रिया


काम जास्त असल्यानेच जन्म-मृत्यू दाखल्यांना गर्दी

महापालिकेचे स्पष्टीकरण : गर्दी न करण्याचे आवाहन

## इ) ई-ऑफिसद्वारे निकाली काढलेल्या नस्तींची टक्केवारी

ई-ऑफिसद्वारे निकाली काढलेल्या नस्तींची टक्केवारी : 80%


शाहूनगरात नळाला चक्क गुलाबी पाणी

नागरिकांत भीतीचे वातावरण : चौकशी सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क


एअर व्हॉल्व्हमधून रंग टाकल्याने गुलाबी पाणी

शाहूनगर परिसरातील पाण्याचा लागला छडा

लोकमत न्यूज नेटवर्क

## ई) वृत्तपत्रातील शासन विरोधी बातम्यांबाबत खुलासा करणे

• महानगरपालिके विरोधात येणाऱ्या बातम्यांबाबत वृत्तपत्रात दुसऱ्या दिवशीच खुलासा करण्यात येतो.

• संबंधित विभागप्रमुख व जनसंपर्क अधिकारी यांची जबाबदारी.

# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण

## अ) नव्याने सेवेत प्रविष्ट झालेले कर्मचारी प्रशिक्षण

- नवीन कर्मचाऱ्यांसाठी नियुक्तीनंतर संगणकीय प्रणाली, ई-ऑफिस प्रणाली तसेच कार्यालयीन कामकाजाचे नियमित प्रशिक्षण.
- पदोन्नती झालेले 93 कर्मचाऱ्यांना जानेवारी 2025 मध्ये 'All India Institute of Local Self Government' संस्थेतर्फे प्रशिक्षण.
- वर्ग 4 संवर्गातील एकूण 40 कर्मचाऱ्यांना मार्च 2025 मध्ये 'रामेती' संस्थेतर्फे प्रशिक्षण.
- तांत्रिक अधिकारी-कर्मचारी यांना वेळोवेळी महाटेंडर्स, GeM पोर्टलचे प्रशिक्षण.
- वरिष्ठ अधिकारी यांना LBSNAA, मसुरी तसेच यशदा, पुणे व World Bank Procurememt Policy चे मुंबई येथे कार्यालयीन प्रशिक्षणासाठी पाठविणेत आले आहे.







## आ) सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे (31 मार्च 2024 पर्यंत)

- वर्ग 1 ते 3 या संवर्गातील अधिकारी-कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल त्यांचे नियंत्रण अधिकारीमार्फत प्रतिवेदन अधिकारी यांचेकडून रचना व कार्यपद्धती विभागाकडे जमा करण्यात आले आहेत.

# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण

## इ) सेवा जेष्ठता याद्या प्रसिद्ध करणे व पदोन्नत्या करणे

- वर्ग 1 ते 3 तसेच वर्ग 4 मधील कर्मचाऱ्यांची अंतिम सेवा जेष्ठता यादी, अनुकंपा प्रतीक्षासूची संकेतस्थळावर प्रसिद्ध.
- पदोन्नती देण्यात आलेले कर्मचारी संख्या : 61 (वर्ग 4 मधून वर्ग 3 मध्ये)
- पदोन्नती देण्यात आलेले कर्मचारी संख्या : 33 (वर्ग 2, वर्ग 3)
- लाड पागे समिती (वारसा) नियमानुसार नियुक्त कर्मचारी संख्या : 39
- आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेल्या कर्मचारी संख्या : 73
- अनुकंपा तत्वानुसार नियुक्त कर्मचारी संख्या : 27
- कायम केलेले रोजंदारी कर्मचारी संख्या : 490




सार्वजनिक सूचना

| अ.क्र. | विभाग | विषय |
| --- | --- | --- |
| 1 | कामगार | जाहीर प्रसिद्धीकरण - सन २०२२ मधील कार्यरत वर्ग ४ कर्मचाऱ्यांची अंतिम सेवा जेष्ठता यादी |
| 2 | कामगार | जाहीर प्रसिद्धीकरण - दि. ०१/०१/२०२२ ते दि. ३१/१२/२०२२ या कालावधीतील कार्यरत वर्ग १ ते वर्ग ३ कर्मचाऱ्यांची अंतिम जेष्ठता सूची |
| 3 | परवाना विभाग | सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता परवाने नुतनीकरण फी |
| 4 | आरोग्य, स्वच्छता व रुग्णालय | जाहीर प्रसिद्धीकरण - सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका रुग्णालय/दवाखाने वैद्यकीय सेवा शुल्क निश्चितीबाबत |
| 5 | शहर अभियंता/सार्वजनिक बांधकाम विभाग | महाराष्ट्र प्रतिसाद क्षमता विकास कार्यक्रम (MRDP) - Stakeholder Consultation |
| 6 | घरफाळा विभाग | जाहीर प्रसिद्धीकरण - थकीत रक्कम असणाऱ्या मिळकतधारकांची बोजा नोंद करणेचे अनुषंगाने प्रसिद्ध करावयाची प्रारूप यादीबाबत सूचना |
| 7 | घरफाळा विभाग | जाहीर प्रसिद्धीकरण - थकीत रक्कम असणाऱ्या मिळकतधारकांची बोजा नोंद करणेचे अनुषंगाने प्रसिद्ध करावयाची प्रारूप यादी - विभागीय कार्या. क्र. १ |
| 8 | घरफाळा विभाग | जाहीर प्रसिद्धीकरण - थकीत रक्कम असणाऱ्या मिळकतधारकांची बोजा नोंद करणेचे अनुषंगाने प्रसिद्ध करावयाची प्रारूप यादी - विभागीय कार्या. क्र. २ |
| 9 | घरफाळा विभाग | जाहीर प्रसिद्धीकरण - थकीत रक्कम असणाऱ्या मिळकतधारकांची बोजा नोंद करणेचे अनुषंगाने प्रसिद्ध करावयाची प्रारूप यादी - विभागीय कार्या. क्र. ३ |
| 10 | घरफाळा विभाग | जाहीर प्रसिद्धीकरण - थकीत रक्कम असणाऱ्या मिळकतधारकांची बोजा नोंद करणेचे अनुषंगाने प्रसिद्ध करावयाची प्रारूप यादी - विभागीय कार्या. क्र. ४ |
| 11 | कामगार | जाहीर प्रसिद्धीकरण - अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत दि. ०८/०७/२०२१ ते दि. २८/०८/२०२४ पर्यंतची प्रारूप अनुकंपा प्रतीक्षासूची यादी. |
| 12 | कामगार | जाहीर प्रसिद्धीकरण - अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत दि. ०८/०७/२०२१ ते दि. २८/०८/२०२४ पर्यंतची प्रारूप अनुकंपा प्रतीक्षासूची यादी. |





लाड पागे समिती
नियुक्तीपत्र प्रदान

## उ) न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी प्रकरणे यांचा निपटारा करणे

- न्यायालयीन प्रकरणांची संख्या एकूण 1,478 असून विविध न्यायालयांमध्ये 946 प्रकरणे प्रलंबित.
- प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी जेष्ठ व तज्ञ विधीज्ञांचे पॅनल तयार करण्यात आले आहे.
- एकूण 32 विभागीय चौकशी प्रकरणांपैकी 5 प्रकरणांवर चौकशी पूर्ण. उर्वरित प्रकरणांचा त्वरित निपटारा करण्यासाठी उपाय योजना करण्यात येत आहेत.

# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण

**उ) अधिकारी-कर्मचारी यांना कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान वापराबाबत प्रशिक्षण**

- कृत्रिम बुद्धिमत्ता उपकरणे जसे ChatGPT, Gemini, Grok, ClickUp, Guru, Murf, Gamma, इ. चा खालीलप्रमाणे वापराबाबत प्रशिक्षण देण्यात आले.
  - ➢ एप्रिल 2025 मध्ये 4 विविध सेशनमध्ये एकूण 220 कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण.
  - ➢ सादरीकरण करणेसाठी अद्ययावत प्रेजेंटेशन तयार करणे.
  - ➢ प्रस्ताव, पत्र, इ. तयार करणे.
  - ➢ एक्सेल फाईलमध्ये कामकाज करणे.
  - ➢ विविध प्रकारची कामे करताना आराखडा तयार करणे.

Grok





# 8. आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन

**अ) गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे**

- बांधकाम परवानगीसाठी BPMS पोर्टलचा वापर. प्रकरणांची तात्काळ निर्गती.
- बांधकाम व्यावसायिकांसाठी जानेवारी ते मार्च 2025 कालावधीत 3 वेळा विशेष कॅम्पचे आयोजन.
- विशेष कॅम्पमध्ये विविध विभागांचे ना-हरकत दाखले तात्काळ जागेवरच उपलब्ध.




**आ) व्यापारी/कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविणे**

- CREDAI सोबत बैठका घेऊन बांधकाम व्यावसायिक यांचे अडचणी निराकरण.
- चेंबर ऑफ कॉमर्स सोबत बैठका घेऊन Fire NOC, व्यावसायिक परवाना, मनपा गाळे भाडेनिश्चिती, इ. विषयांचे निराकरण.







**ई) गुंतवणूकदार उद्योजकांसाठी प्रक्रीयेचे सुलभीकरण करणे**

- बांधकाम परवाना मंजुरीसाठी मार्च 2025 मध्ये विशेष दोन दिवसीय कॅम्पचे आयोजन.
- सदर कॅम्पमध्ये एकूण 65 प्रकरणे मंजूर होऊन रु. 5.26 कोटीचे इतके उत्पन्न प्राप्त.

# 9. नाविन्यपूर्ण उपक्रम – सुकर जीवनमान

## 1. पाणीपट्टी भरणा – Spot Billing and Collection

- कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय प्रणालीद्वारे 100% **डिमांड बिल जनरेशन**.
- ई-गव्हर्नन्स यंत्रणेसोबत संलग्निकरणामुळे कामकाजात पारदर्शकता.
- पाणीपट्टी बिल तसेच कर भरणा पावतीची **नागरिकांना घरपोच सेवा**.
- अतिशय जलद सेवेमुळे **पाणीपट्टी उत्पन्नात वाढ**.
- दि. 31 मार्च 2025 अखेर Spot Billing द्वारे जमा रक्कम: 3,97,38,353/-




| पूर्वी | आता |
|---|---|
| १. रीडिंग नोंदणीसाठी मीटर रीडर जागेवर जाणे.<br>२. रीडिंग घेऊन विभागात येऊन बिल तयार करणे<br>३. तयार केलेले बिल नागरिकांना वितरण करणे.<br>४. बिल भरणा करण्यासाठी नागरी सुविधा केंद्रात जाणे.<br>५. ही पद्धत वेळखाऊ आणि त्रासदायक होती. | १. मीटर रीडरद्वारे रीडिंग घेऊन मोबाईलद्वारे जागेवरच बिल तयार करणे.<br>२. नागरिकाकडून जागेवरच बिल भरणा होऊन तत्काळ पावती मिळणे. |

# 9. नाविन्यपूर्ण उपक्रम – सुकर जीवनमान

## 2. Kiosks व myKMC मोबाईल ॲप


- ऑनलाईन भरणा करणेसाठी नागरिकांना myKMC ॲप व विविध ठिकाणी एकूण 10 - Kiosk machines उपलब्ध.
- ऑनलाईन पेमेंटसाठी नेट बँकिंग, क्रेडीट/डेबिट कार्ड, क्यू.आर.कोड, युपीआय, गुगल पे, फोन पे, इ. पेमेंट पर्याय उपलब्ध.
- Kiosk and myKMC ॲपचे ई-गव्हर्नन्स यंत्रणेसोबत संलग्नीकरण.
- मागील वर्षीच्या तुलनेत <u>अंदाजे रु. 8 कोटी जास्त</u> ऑनलाईन कर भरणा.
- दि. 31 मार्च 2025 अखेर एकूण मालमत्ता कर (Online) : रु. 16.77/- कोटी
- दि. 31 मार्च 2025 अखेर पाणीपट्टी (Online) : रु. 16.26/- कोटी












# 9. नाविन्यपूर्ण उपक्रम – सुकर जीवनमान

## 3. रंकाळा तलाव सौंदर्यीकरण

- रंकाळा तलाव ऐतिहासिक असून त्याचा ऐतिहासिक देखावा टिकवून सौंदर्यीकरण.
- परिसरात 120 – Heritage Lamps, Landscaping, Walking Track नागरिकांना बसण्यासाठी बेंच, दिशादर्शक फलक, इ. सुविधा.






बोंद्रे नगर प्रधानमंत्री आवास प्रकल्प

## 4. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

- शासकीय जागेवर अतिक्रमित 77 झोपडपट्टीधारकांना भोगवटा वर्ग-2 या धारणाधिकारावर मालकी हक्क देण्यात आला.
- 57 लाभार्थ्यांसह CIBIL Score कमी असणारे लाभार्थ्यांना बँकेकडून त्वरित कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी मनपाकडून विशेष सहकार्य.
- विशेष कॅम्पद्वारे त्वरित बांधकाम परवानगी तसेच Completion Certificate देण्यात आले.
- बांधकाम परवानगी अंतर्गत शासन उपकराची एकूण रक्कम रु. 9 लक्ष इतकी रक्कम CSR मधून प्राप्त.
- CSR मधून Community Hall चे बांधकाम पूर्ण.
- शहरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना, अमृत योजना, इ. मधून पाणीपुरवठा व मलनिस्सारण जोडणीचे काम पूर्ण.

# 10. नाविन्यपूर्ण उपक्रम – कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

मार्च 2025 मध्ये ना-हरकत दाखला, असेसमेंट उतारा, इ. कामकाजाच्या टप्पे कमी

**1. मालमत्ता कर (ना-हरकत दाखला व असेसमेंट उतारा)**

•यापूर्वीच्या 3 टप्यावरून एका टप्प्यात काम पूर्ण.

• नागरिकांना एकाच दिवसात ऑनलाईनद्वारे प्रमाणपत्र उपलब्ध.

**पूर्वी**

अर्ज करणे → शुल्क भरणे → क्लार्क → अधीक्षक → कर निर्धारक → प्रमाणपत्र

**नंतर**

अर्ज करणे → शुल्क भरणे → प्रमाणपत्र

**2. मालमत्ता कर – नाव हस्तांतरण**

• यापूर्वी 3 टप्प्यात (क्लार्क > कर अधीक्षक > कर निर्धारक व संग्राहक)
• यात सुधारणा करून एक टप्पा कमी. (क्लार्क > कर अधीक्षक)

• **संगणकीय प्रणालीद्वारे विना हस्तक्षेप सर्व तपासणी.**

| पूर्वी | आता |
|---|---|
| • नागरिकांनी मनपात प्रत्यक्ष जाऊन अर्ज करणे.<br>• विविध टप्प्यांवर अर्जाची तपासणी होणे.<br>• यात किमान एक आठवड्याचा कालावधी लागायचा. | • मनपात प्रत्यक्ष जाण्याची आवश्यकता नाही.<br>• नागरिक घरबसल्या ऑनलाईन अर्ज करून शुल्क भरणा करून एका दिवसात काम पूर्ण. |



# 10. नाविन्यपूर्ण उपक्रम – कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

## 3. ISRO अभ्यास दौरा उपक्रम

- शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये स्थान पटकाविलेल्या मनपा शाळांमधून 21 विद्यार्थ्यांची बंगळूरु येथील इसरो केंद्राला फेब्रुवारी 2025 मध्ये भेट.
- विद्यार्थ्यांना सदर भेटी अंतर्गत आवश्यक गणवेश CREDAI यांचेकडून, विमानप्रवासाचा खर्च महानगरपालिकेकडून करण्यात आला.
- सदर उपक्रमामुळे एकूण 52 मनपा शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेशामध्ये यावर्षी 1337 इतकी वाढ.
- कोल्हापूर शहरातील व आसपासच्या गावातील नागरिक शाळेमध्ये प्रवेशासाठी आग्रही.





तरुण भारत संवाद

**मनपा शाळेत प्रवेशासाठी पालकांची गर्दी**

प्रवेशाच्या आदल्यादिवशी सकाळपासून रात्री उशिरापर्यंत शाळेबाहेर रांगा : शाळांत गुणवत्तापूर्ण शिक्षण


**जरगनगर विद्यालयात गुढीपाडव्याच्या पहिल्याच दिवशी प्रवेश 'हाऊसफुल्ल'**

पहिलीला ४०७ पेक्षा जास्त प्रवेश, दुसरी ते सातवीसाठी १३५ नवीन विद्यार्थ्यांची नोंद

# Thank You…